वर्ष -१८, अंक-३९ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. १६ जून २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४

www.attalmat.com

# अट्टलमत

राजमाता जिजाऊसाहेब यांना विनम्र अभिवादन!



# 'महावितरण'ने शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळू नये

## अखिल भारतीय बळीराजा शेतकरी संघटनेचे महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव साळुंके पाटील यांचे निवेदन

दिनेश परदेशी
(अट्टल मत प्रतिनिधी)

थोडा पाउस पडला किंवा वारा वादळ आले तर विद्युत पुरवठा खंडित होवून जातो. तसेच दुरूस्ती करण्यास ही होणारा या मुळे जनता पार कंटाळली आहे. सध्याच्या आधुनिक युगात तरी महावितरणने विद्युत सुविधा चोख देणे काळाची गरज आहे. महावितरण कमीत कमी तक्रार दिल्यानंतरही त्याचे निवारण केले पाहिजे. तक्रार देवूनही अधिकारी, ठेकेदार तसेच संबंधित कर्मचारी जर शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळत असतील तर याचे जबाबदार हेच धरले पाहिजे. प्रगतीकडे न जाता आधोगती का म्हणून जात असतील हे देवच जाणो.

विद्युत पोल कोसळतो त्याची साधी दखल देखील संबंधित घेत नाहीत. गट क्र. १६ रेल शिवार, ता. खुलताबात देखील विद्युत पोलजवळ पावसाचे पाणी साचल्याने विद्युत पोल कोसळला आहे. त्यामुळे तेथे जीवत हानी ही होवू शकते. दखल घेतली असल्यास काही हरकत नसते परंतु त्याकडे चक्क दुर्लक्ष करणे हे योग्य नाही. बोगस व बेजबाबदारीने वागता. शेतकऱ्यांच्या हिताचे काम करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. एखाद्या काम चुकार अधिकाऱ्यामुळे किंवा ठेकेदारामुळे सर्वच महावितरण बदनाम होत असेल तर हा प्रकार वाईट आहे.

'महावितरण'अनेक ठिकाणी यशस्वी रित्या तसेच युद्ध पातळीवर कामे करून चोख सुविधा देखील दिली आहे. त्यांचे मनापासून स्वागत आहे. परंतु बाजारसावंगी येथील अधिकारी मात्र याप्रकरणाकडे का दुर्लक्ष करीत आहे. हे समजत नाही. कामात जर भ्रष्टाचार होत असेल तर अशा अधिकाऱ्यांना व कंत्राटदारांना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रोख लावला तसेच लगाम लावला पाहिजे. परंतु नुसतेच पाहत राहणे योग्य नाही.

बाजारसांगवी येथील कनिष्ठ अभियंता व त्या विभागातील लाईनमन तसेच ठेकेदार यांना लेखी निवेदन देऊन तसेच व्हाटसअप मॅसेज करून सुध्दा त्यांनी त्या विद्युत पोलच्या बाबतीत अद्याप दखल घेतलेली नाही. विद्युत पोल कोसळल्यामुळे तेथे जिवीत हाणी होण्याची दाट शक्यता आहे. असे झाल्यास त्याचो सर्वस्वी जबाबदारी बाजारसांगवी येथील कनिष्ठ अभियंता व त्या विभागातील लाईनमन तसेच ठेकेदार यांची राहील कृपया याची नोंद घ्यावी, असे निवेदन अखिल भारतीय बळीराजा शेतकरी संघटनेचे महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव साळुंके पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहे.

तसेच बाजारसांगवी येथील कनिष्ठ अभियंता व त्या विभागातील लाईनमन यांना जे ठेकेदार पैसे देतात त्यांनाच ते तेथील कंत्राट देतात व त्यांचेच बिल अगोदर पास केले जातात. त्यामुळे या दोन महिन्यात लाखो रुपयांचे बिले ठेकेदारांनी काम न करता कनिष्ठ अभियंता व त्या विभागातील लाईनमन यांच्या मदतीने पास केलेली आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमिता होण्याची शक्यता आहे.

बाजारसांगवी येथील कनिष्ठ अभियंता व त्या विभागातील लाईनमन यांची ताबडतोब हकालपट्टी करून त्यांची चौकशी करावी तसेच तेथील ठेकेदारांकडून ठेका काढून दुसऱ्या ठेकेदारांकडे ते काम द्यावे, आपण असे नाही केल्यास आपल्या विरुध्द मा. उच्च न्यायालय, छ. संभाजीनगर येथे याचिका दाखल करून दाद मागण्यात येईल तसेच आपल्या कार्यालयासमोर अखिल भारतीय बळीराजा शेतकरी संघटनेकडून दि. २३/०६/२०२५ रोजी जन आंदोलन करण्यात येईल जन आंदोलनात अनुचित प्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहील यांची कृपया नोंद घ्यावी, असे आवाहन अखिल भारतीय बळीराजा शेतकरी संघटनेचे महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव साळुंके पाटील यांनी केले आहे.


# वेरुळ लेणींना निसर्गसौंदर्याचा नवा साज, धबधब्यांच्या सानिध्यात पर्यटकांची एकच गर्दी

## तालुक्यातील पर्यटनस्थळी पावसाळ्यामध्ये चारही बाजूंनी हिरव्यागार डोंगरांनी हिरवाईने नटलेल्या डोंगरदऱ्यांनी अधिकच मनमोहक होतो

खुलताबाद
(अट्टल मत प्रतिनिधी)

राज्यातील शाळा आज १६ जून सोमवार पासून सुरू होत असल्याने रविवार दिनांक १५ जून रोजी वेरुळ लेणी परिसरात पर्यटकांची प्रचंड गर्दी पाहायला मिळाली.शनिवार आणि रविवार सलग दोन दिवसांपासून राज्यातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या पर्यटकांनी लेणी परिसर गजबजून गेले होते.ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असलेल्या वेरुळ लेणींनी आज पुन्हा एकदा पर्यटकांचे लक्ष वेधून घेतले आहे.

खुलताबाद तालुक्यातील म्हैसमाळ, जगप्रसिद्ध वेरूळ लेणी, सुलीभंजन येथील दत्त मंदिर परिसर यांसारख्या ठिकाणांना निसर्गाची भरभरून देण लाभली आहे. पावसाळा सुरू होताच संपूर्ण तालुका हिरवळीत न्हालेला दिसत आहे. चारही बाजूंनी नटलेले डोंगर आणि डोंगरदऱ्यांची नैसर्गिक शोभा पाहता खुलताबाद तालुका अधिकच मनमोहक वाटत आहे. या अप्रतिम नजाऱ्यांचा अनुभव घेण्यासाठी पर्यटकांची



मोठ्या प्रमाणावर गर्दी होताना दिसत आहे.

सध्या खुलताबाद शहरासह वेरुळ परिसरात सुरू असलेल्या हलक्या रिमझिम पावसामुळे लेणींचा परिसर संपूर्णपणे हिरवळीत न्हालेला दिसतो आहे. निसर्गाच्या सान्निध्यात लेणी परिसर आणखी आकर्षक झाल्याने पर्यटकांच्या उत्साहात लक्षणीय वाढ झाली आहे. चारही बाजूंनी डोंगर दऱ्यांतून वाहणारे लहान-मोठे धबधबे पर्यटकांना अक्षरशः खुणावत असून, अनेक जण सेल्फी, ग्रुप फोटो आणि व्हिडिओ शूट करून या सुंदर क्षणांचे संजीवक रूपात जतन करताना दिसत होते.

लेणी परिसरातील हिरव्या वनराईची गारवा देणारी झुळूक आणि ऐतिहासिक लेण्यांची प्राचीन वास्तुशैली यांचे मनोहर संमीलन पर्यटकांच्या आनंदात भर घालत होती. काही पर्यटक आपल्या परिवारासोबत निसर्गसौंदर्याचा मनमुराद आनंद लुटताना आढळले, तर काही तरुणाई लेणींच्या निसर्गरम्य पार्श्वभूमीवर सोशल मीडियासाठी फोटोशूट करण्यात गुंग होती. स्थानिक व्यावसायिकांनाही या गर्दीचा लाभ होत असून फळ विक्रेते, खाद्यपदार्थ स्टॉल्स आणि हस्तकला विक्रेत्यांची चांगलीच चलती पाहायला मिळत आहे.पावसाळ्याच्या आगमनाने नवसंजीवनी मिळालेल्या वेरुळ लेणी परिसरात पर्यटकांची वाढती उपस्थिती पाहता स्थानिक प्रशासन आणि पर्यटन विभागाने सुरक्षेच्या व वाहतुकीच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पर्यटकांकडून होत आहे.

# पुण्यात डेमू ट्रेनच्या डब्यात लागली आग, एक माणूस आत अडकला अन्..

**पुणे :** दौंडहून पुण्याला येणाऱ्या डेमू (अएचण) ट्रेनमध्ये सोमवारी सकाळी शटल ट्रेनच्या एका डब्यातील टॉयलेटमध्ये अचानक आग लागली. सकाळी ०७.०५ वाजता ही ट्रेन दौंडवरून पुण्याला जात होती. ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. घटनेमुळे ट्रेनमध्ये काही वेळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. ट्रेनमध्ये लागलेल्या आगीमुळे प्रचंड धूर झाल्याने प्रवासाची पळापळ सुरु होती.



**एक प्रवासी आत अडकला**

या डेमू ट्रेनच्या टॉयलेटमध्ये ज्यावेळी आग लागली त्याचवेळी नेमका एक प्रवासी आत होता. दुर्दैवाने दरवाजा लॉक झाल्यामुळे तो बाहेर पडू शकत नव्हता.

काही वेळातच टॉयलेटमधून धूर बाहेर येऊ लागला आणि आतमधील व्यक्तीचा आरडा-ओरडा ऐकू येऊ लागला. हे लक्षात येताच गाडीत असलेल्या काही सतर्क प्रवाशांनी प्रसंगावधान राखत त्या दरवाज्याकडे धाव घेतली. यानंतर काही प्रवाशांनी टॉयलेटचा दरवाजा तोडण्याचा निर्णय घेतला. प्रवाशांनी दरवाजा तोडून अडकलेल्या व्यक्तीला बाहेर काढले आणि त्याचा जीव वाचवला.

**शॉर्ट सर्किटमुळे आग -** प्रवाशांनी घटनेची माहिती तातडीने स्टेशन मास्तरला दिली. आग आटोक्यात आणण्यासाठी रेल्वे कर्मचाऱ्यांकडून प्रयत्न करण्यात आले. सुदैवाने यात कुठलीही जीवितहानी झाली नाही.

दरम्यान, शॉर्ट सर्किटमुळे आग लागणे ही गंभीर बाब असून रेल्वे प्रशासनाने अशा घटनांना रोखण्यासाठी यंत्रणांची तातडीने तपासणी करावी, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

## संपादकीय

# आता तरी पर्यायी मार्गांचा विचार व्हावा!

उपनगरी गाडीतून प्रवासी पडून मरण पावल्याचे व कायमचे जायबंदी झाल्याची घटना प्रथमच घडलेली नाही. कल्याण-डोंबिवली, दिवा, कळवा, मुंब्रा, ठाणे या पट्ट्यात आजवर हजार प्रवासी गाड्यांतून पडून मृत्युमुखी व जायबंदी झाले आहेत. मात्र एकाच दिवशी एकाच वेळी इतके प्रवासी पडल्याची घटना निराळीच होती. त्यावरून तर्कवितर्क सुरू होऊन सर्वच जणांनी रेल्वे प्रशासनाला लाखोली वाहिली. इतकेच काय या घटनेला संपूर्ण रेल्वेच जबाबदार आहे असे मानून रेल्वेचा उद्धार केला.

मुळात रेल्वेचे प्रश्न हे आजचे नाही. रेल्वे सुरू झाली तेव्हा मानवी लोकसंख्या तेव्हाची लोकसंख्या व आताची लोकसंख्या यात खूप फरक पडला आहे. रेल्वेने पुरेपूर बदलण्याचा प्रयत्नही केला. मात्र वाढत्या लोकसंख्या व मोठ्या प्रमाणात शहरीकरणांपुढे त्या तोकड्या पडल्या.

मुंबई शहराचा व महानगर प्रदेशाचा एकात्मिक विकास करण्याकडे आजवर सर्वांनीच दुर्लक्ष केले. एककेंद्री विकास झाल्याने दुसऱ्या ठिकाणावरून व जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने लोक शहराकडे एकाचवेळी लोंढ्यासारखे जाऊ लागले आणि रेल्वेशिवाय दुसरा कोणताच पर्याय नसल्याने रेल्वेवर पूर्णपणे भार आला. वास्तविक पाहता या रेल्वे अपघाताबद्दल इतर सर्व गोष्टींचा पर्याय आठवडाभर सुरूच होता. मात्र मूळ गोष्टीकडे अजून दुर्लक्षच होत आहे. हो, आपण हे मान्य केले पाहिजे की रेल्वेची आता क्षमता संपली आहे. मात्र आपण अजूनही रेल्वेला मुबलक पर्याय देऊ शकलो नाही हेही खरेच आहे. अपघात झाल्यानंतर सर्व दृष्टीने त्यावर भविष्यात काय करता येईल यावरदेखील विचार झाला. मात्र आजवर मूळ समस्या राहिलेली म्हणजे ठाणे व कल्याण या रेल्वे मार्गाला नसलेला समांतर रस्ते मार्ग. हाच एक इलाज ठरू शकतो.

उपनगरी रेल्वे बंद पडली किंवा त्यावर परिणाम झाला, तर किमान रस्ता मार्ग हा पर्याय मार्ग ठरू शकतो. आज उपनगरी मार्गाला मुंबईहून ठाण्यापर्यंत पूर्व-पश्चिम बाजूस समांतर रस्ते आहेत. तीच गोष्ट पश्चिम रेल्वेवर पूर्व व पश्चिम बाजूस निदान चर्चगेट ते बोरिवलीपर्यंत तरी समान रस्ते आहेत. मात्र ठाणे व बोरिवलीच्या पुढे समांतर रस्ता नाही. ठाण्याच्या पुढे जर कल्याण दिशेने जायचे असल्यास मुंबई नाशिक महामार्ग कल्याण, भिवंडी मार्गाने कल्याण, डोंबिवलीकडे जावे लागते तर व दिव्याकडे जाण्यासाठी अजूनही तशी व्यवस्था नाही. तर कल्याण व डोंबिवलीकडे जाण्यासाठी दुसरा मार्ग म्हणजे ठाणे व शिळफाटा मार्ग.

मात्र या रस्त्यावरून जाणे म्हणजे मोठे दिव्यच असते. मोठमोठ्या अवजड वाहतुकीमुळे अगोदरच ठाणे जिल्ह्याला ग्रासले आहे. त्यात शीळ फाट्यावरून जाणे म्हणजे एक मोठे दिव्यच असते. त्यावरून रोज प्रवास करणे हे हल्लीच्या काही उदाहरणांवरून तापदायक नसून जीव घेणेही ठरले आहे. तीच गत पुढे कल्याणहून टिटवाळा मार्गे कसाऱ्याला समांतर मार्ग हा कसाऱ्यापर्यंत तरी आहे. मात्र हि दूरवरची मार्गिका आहे, तर कल्याण-कर्जतला जाण्यासाठी तसा थेट व सोयीचा मार्ग नाही म्हणून एकदा रेल्वे बंद पडली की चाकरमान्यांना जागच्या जागी थांबण्याशिवाय अथवा घरी परतण्याशिवाय कोणताही पर्याय राहत नाही.

आजपर्यंत रेल्वे मार्गाला समांतर असा ठाणे, मुंब्रा, दिवा, डोंबिवली, कल्याण असा समांतर मार्ग होण्याची बऱ्याचवेळा घोषणा झाली. मात्र प्रत्यक्षात उतरू शकली नाही. या ठिकाणी बराचसा भाग हा कांदळवन व खाडीचा भाग येतो. त्यासाठी वेगवेगळ्या परवानग्या लागतात. मात्र जिथे मुंबईत समुद्रात मार्ग झाले, मुंबईहून नवी मुंबईला जाणारा अटल सेतू झाला, छत्रपती संभाजी महाराज किनारा मार्ग झाला, मुक्त मार्ग झाला तिथे हा रस्ता होण्यास अशी कोणती अडचण होती? याच खाडीपट्ट्यात व ठाणे जिल्ह्यात हजारो संख्येने अनधिकृत बांधकामे झाली हेही नुकताच न्यायालयाने दिलेल्या आदेशात स्पष्ट झाले आहे मात्र तिथे रस्ता बांधण्यास कोणती अडचण येत होती? आजपर्यंत कोणाला हा रस्ता महत्त्वाचा वाटू नये याचे आश्चर्य वाटते. बरं यातील दुसरी बाजू अशी की रस्ते वाहतूक तरी सुरक्षित आहे का? आज मुंबई नाशिक महामार्गाची अवस्था आपण सारे बघतोच आहोत, तोच ठाण्याहून अंजुर फाटा, कल्याण, भिवंडी फाटा इथपर्यंत पोहोचण्यासाठीच बरेच तास लागतात. तोच वाशीहून शिळफाटा मार्गे जायचे असल्यास प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो.

मुंबई नाशिक महामार्गाचे कामे अजूनही संपता संपत नाही. कसारा घाटही आता वाहतुकीसाठी धोकादायक बनला आहे. भिवंडी परिसरातील गोदामातील मोठमोठ्या कंटेनरची वाहतूक रोज हजारोंच्या संख्येने वाशी तुर्भेहून जेएनपीटीकडे जात असते. त्यांना याच रस्त्यांचा वापर करावा लागतो. त्यामुळे स्थानिक शहरांच्या वाहतुकीला मर्यादा येतात. आज ठाणे, भिवंडी, रबाळे, तळोजा, वाशी, बेलापूर आर्थिक केंद्र झाल्यामुळे सतत वाहतूक कोंडीचा फटका येथील स्थानिक जनतेस रोज बसत असतो. एरवी कुठल्या अपघाताचे कारण असते, तर पावसाळ्यात मोठ्या खड्ड्यांचे कारण त्यामुळे वाहतूक कोंडी बरोबरच अपघातांचे प्रमाणही प्रचंड प्रमाणात या पट्ट्यात वाढले आहे. राहता राहिला प्रश्न येथील बस सेवांचा मुंबई शहरात रेल्वे लोकल बरोबरच बेस्ट बस सेवेचा एक पर्याय सक्षम पर्याय आहे. मात्र एकदा ठाण्याच्या बाहेर पडलो की तशी कोणती सोय नाही. त्या-त्या पालिकेच्या परिवहन सेवा आहेत.

# पोटी असा पुत्र जन्माला यावा जो राष्ट्र संरक्षणासाठी एक सक्षम राष्ट्रनायक म्हणून व्हावा

**राजमाता** जिजामाता भोसले यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी बुलढाण्याच्या सिंदखेड येथे लखुजी जाधव परिवारात झाला.बालपणातच त्यांचा विवाह 'शहाजी भोसले यांच्याशी झाला.त्या वेळी शहाजी राजे हे आदिलशाही सुलतानाच्या सैन्यात सुंभेदार होते.त्यांना आपल्या पतीचे कोणत्याही मुस्लिम शासकाची गुलामगिरी करणे आवडत नसे.त्या स्वराज्यवादी विचारधारेच्या एक महान स्त्री होत्या, प्रत्येकाला असं वाटतं की छत्रपती शिवाजींचा पुनर्जन्म व्हावा,पण तो शेजारच्या घरात व्हावा,एकमात्र जिजामाता अश्या होत्या ज्यांना असं वाटायचे की त्यांच्या पोटी असा पुत्र जन्माला यावा जो राष्ट्र संरक्षणासाठी एक सक्षम राष्ट्रनायक म्हणून व्हावा.त्यासाठी त्यांनी स्वतःची घडण अशी केली की त्यांच्या मनावर महाभारत आणि रामायणातील काही तेजस्वी आणि उर्जावान प्रसंग वाचली त्यांच्या वर त्या प्रसंगाची छाप पडली आणि त्यामुळे त्यांनी आपले मन खंबीर केले.त्यांचा विवाह शहाजीराजे भोसले यांच्याशी झाला.त्याकाळी शहाजी भोसले हे निजामाच्या घरी सुभेदार पदावर कार्यरत होते.जिजाऊ मातेला नेहमी असं वाटायचे की शहाजी राजे एवढे पराक्रमी असून देखील त्यांनी एका निजामाकडे गुलामगिरी का करायची ?असं करणे योग्य नाही.

त्या स्वराज्यवादी विचारधारेच्या एक महान स्त्री होत्या,त्यांना कोणाची गुलामगिरी करणे आवडत नसे.म्हणून त्यांना नेहमी असे वाटायचे की त्यांच्या पोटी असा पुत्र जन्माला यावा ज्याच्या नावाचा झेंडा त्रिलोकात पसरावा.ज्याने एक हिंदवी साम्राज्य स्थापित करावे आणि एक संवेदनशील राजा जाणता राजा म्हणून कार्य करावे.जेणे करून हिंदूंवर मुघलांकडून होणारे अत्याचार थांबतील. त्यांनी १९ फेब्रुवारी १६३० ला शिवनेरी गडावर सूर्यास्ताच्या वेळी छत्रपती शिवराय म्हणजेच साक्षात शिवाचा महादेवाचा अवतार छत्रपती शिवाजी राजेंना जन्म दिला. छत्रपती शिवराय हे आपल्या मातोश्रीच्या छत्रछायेखाली लहानाचे मोठे झाले. त्यांनी लहानपणा पासूनच छत्रपती शिवरायांच्या मनात असे संस्कार रुतले जेणे करून ते मोठे होऊन लोक कल्याण कार्याला लागतील आणि एक महान राजे बनतील.जिजाऊ साहेब बाळ शिवरायांना कर्तृत्वान योद्धांच्या गोष्टी सांगायचा,राम,कृष्ण बलाढ्य भीम आणि पराक्रमी अर्जुनाबद्दल सांगायचा. जेणे करून ते देखील त्यांच्या प्रमाणे शूर आणि प्रतापी बनावे.जिजाऊ साहेबांनी शिवरायांना पाळण्यात टाकल्या पासून त्यांनी बाळाला अंगाई म्हणून बाळा निजगडे नसून बाळा उठ गडे उठ उठ शिवराया आक्रांत झाला धर्म परसत्तेच्या तालात परसत्तेच्या आक्रमणामुळे हिंदवी स्वराज्य परस्वाधीन झाले आहे,त्यामुळे उठा शिवराय आणि एका नवीन हिंदवी स्वराज्याची स्थापना करा.अशी अंगाई म्हणत असे.

प्रेरक प्रसंग - छत्रपती शिवराय लहान असताना एकदा ते आपल्या वडिलांसह



औरंगजेबाच्या दरबारात गेले त्याकाळी मुस्लिम शासन होतं.त्यामुळे त्यांची भेट राजाशी करण्यासाठी शहाजी राजे आपल्यासह छत्रपती शिवरायांना घेऊन गेले. मोघल शासक जेथे बसलेले होते त्या खोलीचे दार अरुंद होते आणि उंचीला देखील कमी होते.जेणे करून जो व्यक्ती दरबारात प्रवेश करेल त्याने मान वाकवुनच प्रवेश करावे.अशी काही त्या दाराची घडण होती. छत्रपती बाळ शिवरायांना ही गोष्ट लक्षात आली आणि त्यांनी मान न वाकवता प्रथम आपले पाय त्या दरबारात टाकले.नंतर डोकं वाकविले. शहाजींनी घरी आल्यावर घडलेला प्रसंग जिजाउ साहेबाना सांगितला. हे ऐकून आई साहेबांनी छत्रपती शिवरायांना न रागावता त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली आणि म्हणाल्या की आता खऱ्या अर्थाने हिंदवी स्वराज्यासाठी एक खरा नायक निर्माण होतं आहे.जो अन्याच्या विरुद्ध पाऊल चालणार.त्या दिवशी पासून छत्रपती शिवरायांच्या पाठी त्यांच्या आईचा आशीर्वाद होता.

पुढे अनेक प्रसंग अशी आली जेव्हा छत्रपतींना आपल्या आई च्या आशीर्वादाची त्यांच्या सल्ल्याची गरज होती.आई साहेब छत्रपती शिवरायांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या होत्या.कोणतेही प्रसंग असो आई साहेबांनी नेहमी छत्रपती शिवरायांचे मार्गदर्शन केले. छत्रपती शिवराय देखील त्यांच्या आईच्या मतानुसार कार्य करायचे .तसेच आपल्या मातेच्या प्रत्येक इच्छेला देखील छत्रपती शिवरायांनी पूर्ण केले.

एवढेच नव्हे तर छत्रपतींचे मावळे देखील आई साहेबाना आपल्या आई प्रमाणेच मान देत होते. आऊ साहेब आणि छत्रपती शिवाजींच्या एका शब्दा साठी ते काहीही करण्यास तत्पर असायचे. असेच एक प्रसंग आहे कोंढाण्याच्या किल्ल्याचे जे खूप प्रख्यात आहे. एकदा तानाजी मालसुरे आपल्या मुलाच्या लग्नाची पत्रिका देण्यासाठी आई साहेबांकडे गेले त्यावेळी जिजाऊ माता कोंढाण्याच्या किल्ल्याकडे बघत काही विचारात होत्या. त्यांना तानाजींनी विचारले की आऊ साहेब आपण एवढा काय विचार करीत आहात त्यावर मातोश्री म्हणाल्या की आपल्याला हा कोंढाण्याचा किल्ला मुगलांकडून परत मिळवायचा आहे.असचं होईल आऊ साहेब आपली इच्छेला मान देऊन हा किल्ला आत्ताच मिळवणार. पण तानाजी आपल्या कडे लग्न सोहळा आहे. असं माते त्यांना म्हणाल्या त्यावर ''आधी लग्न कोंडाण्याचे मग रायबाचे '' असं म्हणून तानाजीने आपल्या मुलाचे लग्न पुढे ढकलले आणि तानाजी मालसुरे यांनी कोंढाण्याच्या किल्यावर आक्रमण केले आणि या लढा मध्ये आपले प्राण देऊन कोंढाणाचा किल्ला मिळिवला. त्यावर छत्रपती शिवराय म्हणाले की ''गड आला पण सिंह गेला''

असाच एका प्रसंगी जेव्हा शहाजींच्या निधनानंतर सती होण्यासाठी निघाल्या तेव्हा छत्रपती शिवाजींनी त्यांना अडविले आणि म्हणाले की आऊ साहेब आपण जर सती झाल्या तर धर्माचे पालन तर होईल परंतु राजधर्माचा अस्त होईल म्हणून आपण असं करू नका. आपल्याला राज्यधर्मासाठी जगायचे आहे आणि आम्हाला अजून मार्गदर्शन करायचे आहे. त्यांचे असं म्हणणे ऐकून आऊ साहेबांनी सती न होण्याचे निर्णय घेतले आणि छत्रपती शिवाजी महाराजांना पुढे देखील मार्गदर्शन दिले. जर जिजाऊ साहेब यांनी आपल्या मुलाला म्हणजेच छत्रपती शिवाजी राजेंना हिंदवी स्वराज्य स्थापित करण्याची प्रेरणा दिली नसती तर त्या काळात पतनाकडे जाणाऱ्या विजय नगर साम्राज्यात नंतर हिंदू झेंडा सांभाळणाऱ्या छत्रपती शिवाचा जन्मच झाला नसता.धन्य आहे ती माता आणि धन्य आहे ती मातृ शक्ती.या मातृ शक्तीला मानाचा मुजरा. शिवरायांच्या राज्याभिषेकाचा सुवर्ण सोहळा पाहिल्यानंतर अवघ्या बारा दिवसांतचं इ.स १६७४ मध्ये त्यांचे निधन झाले. हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेत जिजाऊंचा सिंहाचा वाटा होता.

**स्त्रोत - सोशल मिडीया**

## देवगिरी महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदी प्रा. अरुण काटे यांची नियुक्ती



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित देवगिरी कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदी प्रा. अरुण रामचंद्र काटे यांची नियुक्ती करण्यात आली. प्रा. काटे देवगिरी महाविद्यालयात २६ वर्षापासून जीवशास्त्र विभागात अध्यापन, विभागप्रमुख, विज्ञान विभागाचे पर्यवेक्षक देवगिरी महाविद्यालय सेवकांच्या पतसंस्थेचे सचिव तथा देवगिरी मुलांचे वसतिगृह प्रमुख म्हणून त्यांनी केलेले काम उल्लेखनीय आहे. त्यांच्या नियुक्ती बददल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.आ. प्रकाश सोळंके, सरचिटणीस मा.आ.सतीश चव्हाण, स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य पंडितराव हर्षे यांनी त्यांचे अभिनंदन केले. प्राचार्य प्रोफेसर डॉ. अशोक तेजनकर, जेईई व नीट सेलचे संचालक प्रा.एन. जी. गायकवाड, उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते, डॉ. अपर्णा तावरे डॉ. रवी पाटील प्रा. सुरेश लिपाने प्रा. विजय नलावडे आदींनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## विद्युत मोटारीचा विजेचा धक्का लागून महिलेचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील नंद्राबाद येथील छाया प्रमोद तुपे वय ४१ वर्षे या महिलेचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याची घटना रविवारी (ता. एक) घडली. या बाबत अधिक माहिती अशी तालुक्यातील नंद्राबाद येथे तुपे कुटुंबिय राहते नळाला पाणी आले म्हणून त्या विद्युत मोटार लावण्यास गेल्या असता, विजेचा धक्का लागून त्यांचा मृत्यू झाला. घटनास्थळी पोलीस हेड कॉन्स्टेबल शेख जाकेर व के. के. गवळी यांनी भेट देवुन घटनेचा पंचनामा केला, घटनेची नोंद आकस्मिक मृत्यू म्हणून करण्यात आली आहे.

# !!! माझ्या जीवनाच्या हिरोला दंडवत प्रणाम !!!

फादर्स डे अनेक देशांमध्ये जूनच्या तिसऱ्या रविवारी साजरा केला जातो. वडील आणि मुलांचे नाते हे खूप वेगळे असते. फादर्स डे हा आपल्या जीवनातील वडिलांचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जातो. कुटुंबाचा आधारस्तंभ असणाऱ्या वडिलांप्रती आदर आणि प्रेम व्यक्त करण्यासाठी फादर्स डे हा दिवस साजरा केला जातो.म

या दिवशी वडिलांना शुभेच्छा आणि वेगवेगळ्या भेटवस्तू देखील दिल्या जातात. फादर्स डेची मूळ कल्पना अमेरिकेची आहे. सर्वात आधी पितृदिन १९ जून १९०९मध्ये साजरा केला गेला होता. खरे पाहता, वॉशिंग्टनच्या स्पोकेन शहरात मुलगी सोनोरा डॉडने आपल्या वडीलांच्या आठवणींत या दिवसाची सुरुवात केली होती. हा दिवस फादर्स डे म्हणून साजरा करण्याची प्रेरणा त्यांना सन १९१०मध्ये सुरु झालेल्या मदर्स डेपासून मिळाली. अध्यक्ष लिंडन बी.जॉन्सन यांनी सन १९६६मध्ये अधिकृतपणे जूनचा तिसरा रविवार फादर्स डे म्हणून घोषित करण्यासाठी राष्ट्रपती पदाच्या घोषणेवर स्वाक्षरी केली. त्यानुसार १९ जून हा फादर्स डे म्हणून साजरा केला जाऊ लागला.

आपले वडील आपल्यासाठी किती खास आहेत त्याची जाणीव मुलं त्यांना या गोष्टींमधून करुन देतात. बर्याचदा मुलं जितकी आपल्या आईविषयी असणारे प्रेम मोकळेपणाने व्यक्त करतात तेवढे बाबांविषयी असणारे प्रेम व्यक्त करत नाही. कसा करावा साजरा पितृदिन? तर मातृदिन प्रमाणे पितृदिनही जगभरात मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. फादर्स डेला मुलं आपल्या प्रेमळ वडिलांना खास भेटवस्तू देतात आणि आनंद आणि उत्साहात त्यांची कृतज्ञता व्यक्त करतात. नुकतंच पितृत्व लाभलेल्या पित्यासाठी फादर्स डे खूप महत्त्वाचा असू शकतो. असे नवपिता या दिवशी स्वतःच्या वडिलांकडून पितृत्वाचे धडे घेऊ शकतात. कारण आईप्रमाणे बाबा होणं हीदेखील एखाद्याच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय घटना असू शकते. या खास दिवशी तुमच्या लाडक्या बाबांसोबत ऑनलाईन माध्यमातून तुम्ही फादर्स डे साजरा करू शकता. पितृदिनाचा संबध हा थेट मातृदिनाशी आहे. कारण सर्वात प्रथम जगभरात मातृदिन साजरा करण्याची पद्धत सुरू झाली.



मातृदिनाचा इतिहास सन १८६० या दशकाशी संबधित आहे. अमेरिकेत १९१४सालापासून मातृदिनासाठी राष्ट्रीय सुट्टी जाहीर करण्यात येऊ लागली. मात्र यामुळे पितृदिन साजरा करण्याची मागणी होऊ लागली. कारण जर एका पालकासाठी एखादा खास दिवस साजरा केला जात असेल तर दुसऱ्या पालकाचाही या आनंदावर तितकाच हक्क आहे. ज्यामुळे पुढे ५ जुलै १९०८मध्ये पश्चिम वर्जिनियामध्ये एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये फादर्स डेसाठी ३६२ पित्यांचा सन्मान करण्यात आला. हे सर्व पिता आधीच्या वर्षी डिसेंबरमध्ये एका कोळशाच्या खाणीत झालेल्या स्फोटात मरण पावले होते. अशा पद्धतीने पितृत्वाचा सन्मान करणारा फादर्स डेसाठी पहिला कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

पितृदिन हा पितृत्व आणि पितृत्वाच्या बंधनांचा तसेच समाजातील वडिलांच्या प्रभावाचा सन्मान करण्याची सुट्टी आहे. युरोपातील कॅथोलिक देशांमध्ये, मध्ययुगापासून १९ मार्च हा सेंट जोसेफ डे म्हणून साजरा केला जात आहे. युनायटेड स्टेट्समध्ये फादर्स डेची स्थापना सोनोरा स्मार्ट डॉड यांनी केली आणि सन १९१०मध्ये पहिल्यांदा जूनच्या तिसऱ्या रविवारी साजरा केला गेला. हा दिवस जगभरात विविध तारखांना आयोजित केला जातो आणि विविध प्रदेश पितृत्वाचा सन्मान करण्याच्या त्यांच्या स्वतःच्या परंपरा राखतात. फादर्स डे हा लिथुआनिया आणि स्पेनच्या काही भागांमध्ये एक मान्यताप्राप्त सार्वजनिक सुट्टी आहे आणि सन १९७७पर्यंत इटलीमध्ये असे मानले जात होते. एस्टोनिया, सामोआ आणि दक्षिण कोरियामध्ये ही राष्ट्रीय सुट्टी आहे, जिथे तो पालक दिन म्हणून साजरा केला जातो. ही सुट्टी कुटुंबातील सदस्यांचा सन्मान करणाऱ्या अशाच समारंभांना पूरक आहे, जसे की मदर्स डे, सिबलिंग डे आणि आजोबा दिवस.

कॅथोलिक युरोपमध्ये पितृत्वाचा उत्सव साजरा करण्यासाठी एक प्रथागत दिवस किमान सन १५०८पासून ओळखला जातो. सामान्यतः १९ मार्च रोजी सेंट जोसेफचा मेजवानी दिवस म्हणून साजरा केला जातो, ज्यांना कॅथलिक धर्मात पितृ पोषणकर्ता डोमिनी-लॉर्डचे पोषणकर्ता आणि दक्षिण युरोपीय परंपरेत येशूचे पुष्ट पिता म्हणून संबोधले जाते. हा उत्सव स्पॅनिश आणि पोर्तुगीजांनी अमेरिकेत आणला होता.



– संकलन व शब्दांकन –
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

कॅथोलिक चर्चने १४व्या शतकाच्या शेवटच्या वर्षांपासून किंवा १५व्या शतकाच्या सुरुवातीपासून सेंट जोसेफ डेवर पितृत्वाचा उत्सव साजरा करण्याच्या प्रथेला सक्रियपणे समर्थन दिले, उघडपणे फ्रान्सिस्कन्सच्या पुढाकाराने. कॉप्टिक ऑर्थोडॉक्स चर्चमध्ये सेंट जोसेफ डेवर पितृत्वाचा उत्सव देखील साजरा केला जातो, परंतु कॉप्ट्स हे २० जुलै रोजी पाळतात. कॉप्टिक उत्सव पाचव्या शतकातील असू शकतो.

हा दिवस जगभरात साजरा करायचा की नाही हा वादाचा विषय राहिला. सन १९०८मध्ये ग्रेस गोल्डन क्लेटन यांनी अमेरिकेतील खाण दुर्घटनेत प्राण गमावलेल्या व्यक्तींना सन्मानित करण्यासाठी हा दिवस प्रस्तावित केला. तेव्हा ते स्वीकारले गेले नसले तरी, सन १९०९मध्ये सोनोरा स्मार्ट डॉड, ज्याला तिच्या पाच भावांसह तिच्या वडिलांनी एकट्याने वाढवले होते, चर्चमध्ये मदर्स डेला उपस्थित राहिल्यानंतर स्पोकेन मिनिस्ट्रियल असोसिएशनला जगभरात फादर्स डे साजरा करण्यास राजी केले. फादर्स डे व्यतिरिक्त, अनेक देशांमध्ये १९ नोव्हेंबर रोजी पुरुष आणि मुले यांच्या सन्मानार्थ आंतरराष्ट्रीय पुरुष दिन साजरा केला जातो.

वडिलांप्रती प्रेम व्यक्त करणारा दिवस म्हणजेच फादर्स डे. फादर्स डेची मूळ कल्पना अमेरिकेची आहे. सर्वात आधी पितृदिन १९ जून १९०९मध्ये साजरा केला गेला होता. वडील आणि मुलांमधील नातं खूप खास असतं. हे नातं अधिक खास करण्यासाठी आपण दरवर्षी फादर्स डे साजरा करतो. खरंतर फादर्स डेची तारीख वर्षानुवर्ष बदलत असते. फादर्स डे अनेक देशांमध्ये जूनच्या तिसऱ्या रविवारी साजरा केला जातो.फादर्स डे प्रत्येक देशांत एकाच दिवशी साजरा केला जात नाही.

फादर्स डे भारतात जूनच्या तिसऱ्या रविवारी साजरा केला जातो, तर अमेरिका आणि इतर काही देशांमध्ये, पोर्तुगाल, स्पेन, क्रोएशिया आणि इटलीसह इतर देश १९ मार्च रोजी फादर्स डे साजरा करतात. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, फिजी आणि पापुआ न्यू गिनी यामध्ये सप्टेंबर महिन्यात फादर्स डे साजरा केला जातो.

सन १९१६मध्ये अमेरिकेमध्ये राष्ट्रपती वुडरो विल्सन यांनी या दिवसाला जागतिक स्तरावर साजरा करण्याची मान्यता दिली होती. त्यानंतर सन १९२४मध्ये राष्ट्रपती कॅल्विन कुलिज यांनी या दिवसाला एक राष्ट्रीय आयोजन म्हणून घोषित केलं. त्यानंतर सन १९६६मध्ये पहिल्यांदा राष्ट्रपती लिंडन जॉन्सन यांनी जूनच्या तिसऱ्या रविवारी हा दिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला आणि त्यानंतर सन १९७२मध्ये राष्ट्रपती रिचर्ड निक्सन यांनी पहिल्यांदा या दिवसाला अधिकृतरित्या साजरा करण्याची घोषणा केली.

खरंतर ज्याप्रमाणे आपण आपल्या आईसाठी मदर्स डे साजरा करतो त्याप्रमणेच आपले वडिलही आपल्यासाठी किती खास आणि महत्त्वाचे आहेत हे दाखवून देण्याचा दिवस म्हणजे फादर्स डे. या दिवशी मुलं आपल्या वडिलांसाठी खास सरप्राईज प्लॅन करतात. त्यांना भेटवस्तू देतात. थोडक्यात आपले वडील आपल्यासाठी किती खास आहेत त्याची जाणीव मुलं त्यांना या गोष्टींमधून करुन देतात. बऱ्याचदा मुलं जितकी आपल्या आईविषयी असणारे प्रेम मोकळेपणाने व्यक्त करतात तेवढे बाबांविषयी असणारे प्रेम व्यक्त करत नाही.

मात्र, या दिवशी आपण बाबांविषयी असणाऱ्या आपल्या भावना अगदी मोकळेपणाने व्यक्त करु शकतो. म्हणूनच या दिवसाला विशेष असं महत्त्व आहे. प्रत्येक देशात एकाच दिवशी फादर्स डे साजरा केला जावा, अशी या लेखप्रपंचाच्या माध्यमातून अपेक्षा!

!! जागतिक वडिल दिनाच्या समस्त पुत्र-पुत्रींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# पावसाळ्यात वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करा - एपीआय विद्या झिरपे



**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

पावसाळ्यात रस्त्यांवर पाणी तुंबणे, चिखल साचणे आणि मातीमुळे वाहने घसरण्याचे प्रमाण वाढते. त्यातच भरधाव वेगाने वाहन चालवल्यास नियंत्रण सुटून अपघात होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे वाहनचालकांनी सुरक्षित आणि नियंत्रित वेगात वाहन चालवावे, असे आवाहन महामार्ग पोलीस केंद्र खुलताबादच्या नव्याने रुजू झालेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षक विद्या झिरपे यांनी केले आहे.

राष्ट्रीय महामार्गावर अपघातांचे प्रमाण वाढले असून त्यामागे अतिवेग, वाहतूक नियमांचे उल्लंघन, अल्पवयीन मुलांच्या हाती वाहन देणे, हेल्मेट व सीट बेल्ट न लावणे ही मानवी कारणे असल्याचे त्यांनी सांगितले. लहान मुलांना दुचाकीच्या पेट्रोल टाकीवर बसवू नये, हेल्मेट आणि सीट बेल्टचा अनिवार्य वापर करावा, असे त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय महामार्गावर कोणतीही अडचण आल्यास पोलीस व अंमलदार मदतीसाठी तत्पर असल्याचेही त्यांनी सांगितले.

# श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स प्रांतीय युवा शाखेतर्फे ५४ हजार वृक्ष लागवडीस प्रारंभ



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - श्री. ऑल इंडिया श्श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स प्रातीय युवा शाखा चतुर्थ झोन महाराष्ट्र व श्रृताचार्य वाणीभुषण उत्तरभारतीय प्रवर्तक गुरफ्देव प.पु.अमरमुनिजी मसा यांच्या संयम अमृत महोत्सव व दिक्षा दिवसा निमीत्त राष्ट्रीय युवा शाखा नवि दिल्ली चे अध्यक्ष विपुल जैन व राष्ट्रीय युवा महामंत्री अमित जैन यांच्या संकल्पनेनुसार पर्यावरण संरक्षणासाठी प्रांतीय युवा शाखा चतुर्थ झोन महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष हितेश कांकरिया व प्रांतीय महामंत्री निकेतन कोठारी, जिल्हाध्यक्ष व प्रकल्पप्रमुख आशिष बोथरा यांनी संपुर्ण महाराष्ट्रात ५४ हजार वृक्ष लावण्याचा संकल्प प्रारंभ करण्यात आला. याच अंतर्गत छत्रपती संभाजीनगर शहरात जैन कॉन्फरन्सचे विहार धाम योजनाचे राष्ट्रीय चेअरमेन तनसुख झांबड, राष्ट्रीय मंत्री मिठालाल कांकरिया, प्रांतीय माजी अध्यक्ष मदनलाल लोढा, राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य रोहीत छाजेड, अल्पसंख्याक चे राष्ट्रीय युवा अध्यक्ष रवि लोढा, श्रावक संघाचे मंत्री दिलीप मुगदिया, हडको श्री.संघाचे अध्यक्ष विजय देसरडा, भाजपा महिला उपाध्यक्षा मनिषा भंसाली, प्रांतीय उपाध्यक्ष योगेश रफ्णवाल, प्रातीय मंत्री अजिंक्य शिंघवी, कर्ांतीय प्रसार प्रचार मंत्री कुलदिप बाफना, व अक्षय श्रीश्रीमाल, निलेश नहाटा, सागर संचेती, गौतम सोनी आदीच्या उपस्थितीत वृक्षारोपन करण्यात आले.

# एल.डी. ताटू सामाजिक कार्यकर्ते यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्ष रोपवन पूरक पर्यावरण दिवस




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

पुंडलिकनगर येथे सकाळी तेजस्विनी इंग्रजी शाळा च्या पहिल्या दिवस विद्यार्थी चे स्वागत पेढे वाटून स्वागत केले या वेळी उपस्थित शाळेचे संचालक मा.डिगंबर बगाळे सर व प्राचार्या अर्चना बगाळे तर ८.३० ला सावतामाळी उधाण सिडको पारिजात नगर उधाण येथे वक्ष लागवड जांभुळ व इतर वृक्ष लागवड करून जबाबदारी घेऊन पाणी घालून जगवतील अशी व्यवस्था केली तर अकरा वाजता महापुरुषांचे ग्रंथ वाटून प्रेरणादायी विचार आत्मसात करून एकात्मता निर्माण व्हावी अनेक उपक्रम राबविले जातात निराधार महिलांना दिवाळी भेट तर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सन्मान व कर्तव्य दक्ष महिलांना सन्मान पुरस्कार सावित्रीबाई फुले व शैक्षणिक क्षेत्रात आदर्श शिक्षक पुरस्कार आदी उपक्रम राबविले जातात आजच्या दिवशी शिवराणा सेवा संघ व नागरी विकास सेवाभावीसंस्था वतीने आयोजित अँड सुभाष कोकुल्डे, दुर्गासिंग महेर, भाऊसिंग बैनाडे, देविदास जाधव,आनंद बारवाल, अंजली कोकुल्डे,नारायण उटाडे, गणेश राजपूत, सुनील वाघमारे आदी उपस्थित होते.



मा.एल.डी. ताटू अध्यक्ष शिवराणा सेवा संघ व नागरी विकास सेवाभावीसंस्था यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षरोपण करतांना समाज बांधव सहभागी या वेळी शपथ घेऊन लावलेल्या झाडांना पाणी देण्याचीही जबाबदारी घेऊन खास गावाराण जांभुळ लागवड करण्यात आली प्रत्येकाला आव्हान आहे की वाढदिवस वृक्ष लावून साजरा करावा मा. श्री. एल.डी. ताटू साहेब यांच्या वाढदिवसा निमित्त तेजस्विनी इंग्लिश स्कूल गारखेडा परिसर छत्रपती संभाजीनगर येथील विद्यार्थांना पेढे वाटून आजपासून शाळा सुरुवातीचा पहिला दिवस उत्साहात संपन्न झाला.

# भारतीय दलित पँथरतर्फे गौरव सन्मान पुरस्कार



भारतीय दलित पँथर सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्य छत्रपती संभाजीनगर यांच्यातर्फे 'अट्टल मत'चे संपादक रशपालसिंग अट्टल यांचा गौरव सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आला. यावेळी संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण भुतकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# खुलताबाद शहरात साळी समाजाच्या खाजगी जागेवर अनधिकृत सभागृहाचे बांधकाम खुलताबाद येथील तहसीलदारांना निवेदन

**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

शहरातील साळी समाजाच्या खाजगी जागेवर नगर परिषदेच्या वतीने सार्वजनिक सामाजिक सभागृहाचे अनधिकृत बांधकाम सुरु करण्यात आला असून याच्या विरोधात साळी समाजातर्फे शुक्रवारी (ता.१३) रोजी तहसीलदार स्वरूप कंकाळ यांना निवेदन देण्यात आले असून, सदर बांधकाम तत्काळ थांबवण्याची आणि दोषींवर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. खुलताबाद नगरपरिषद हद्दीतील वॉर्ड क्रमांक ०१ मधील मालमत्ता क्र. ९५ ही जागा 'साळी पंचाचे घर' या नावाने साळी समाजाची मालकीची आहे. या जागेवर श्री जिव्हेश्वर मंदिर उभारण्याचा साळी समाजाचा प्रस्ताव असून,गेल्या अनेक वर्षे ही जागा समाज कार्यासाठी वापरात आहे. खुलताबाद गर परिषदेने शासनाला सादर केलेल्या प्रस्तावामध्ये सदरील खाजगी मालकीची जागा सार्वजनिक असल्याचे भासवले. त्याआधारे शासन निर्णयानुसार ५० लाख रुपये मंजूर करून सामाजिक सभागृहाचे बांधकाम सुरू करण्यात आले. मात्र ही जागा खाजगी असल्यामुळे ही मंजुरी दिशाभूल करून मिळवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम उपविभाग खुलताबादचे उपअभियंता यांनी दि. ६ जून २०२५ रोजी गुत्तेदार 'एस.पी. सादर कन्स्ट्रक्शन' इंदापूर यांना स्पष्टपणे बांधकाम थांबवण्याचे आदेश दिले आहेत, कारण ही जागा खासगी असून त्यावर सरकारी निधीतून बांधकाम करणे नियमबाह्य आहे.तसेच, साळी समाजाच्या जागेवर असलेले सुमारे ३० वर्ष जुने मोठे उंबराचे झाड गुत्तेदाराच्या सांगण्या वरून बेकायदेशीररित्या तोडण्यात आले व विक्री करण्यात आल्याचा आरोप ही करण्यात आला आहे. या प्रकाराबाबत दि. ९ जून २०२५ रोजी नगर परिषदेला पत्र देत संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी साळी समाजा बांधवांनी केली आहे.

संपूर्ण प्रकारामुळे साळी समाजा संतापाचे वातावरण असून, साळी समाजाने या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी साळी समाजा शेकडो महिला व पुरुष यांनी तहसील प्रशासनाकडे केली आहे.

# भद्रा मारुती-पंढरपूर दिंडीचे मंगळवारी होणार प्रस्थान ४ जूलैला पोहोचणार : परिसरातील भाविकांनी पायी दिंडीत सहभागी होण्याचे आयोजकांचे आवाहन

**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद शहरातून ते श्रीक्षेत्र पंढरपूर पायी दिंडीचे १७ जून रोजी मंगळवार रोजी दुपारी बारा वाजता महाआरती होऊन पंढरपूर कडे प्रस्थान होणार आहे.

सहदेव महाराज यांच्या आशीर्वादाने व यादव काका महाराज आसेगाव यांच्या अध्यक्षतेखाली व गजानन महाराज बारगळ, साहेबराव महाराज शेळके धाम ोरीकर, बाळकृष्ण महाराज लोंढे व सर्व विश्वस्त यांच्या सहकार्याने - तसेच मिठू पाटील बारगळ, भद्रा मारुती संस्थान अध्यक्ष व समस्त विश्वस्त मंडळ यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीफळ फोडून दिंडीचे प्रस्थान होणार आहे.

दौलताबाद, आसेगाव, धुपखेडा, पैठण, देवी लिमगाव, जातेगाव, शेलगाव, करकंब मार्गे ही दिंडी पंढरपूर येथे ४ जुलै रोजी पोहोचेल..

**वारकऱ्यांना करण्यात आल्या सूचना**

दिंडीत येणाऱ्या व्यक्तीने सामान मर्यादित आणावे जेवणाचे ताट, तांब्या, टाळ बरोबर असावे.पायी चालता येत असल्या दिंडीत यावे नियमबाह्य वागल्यास दिंडीतून काढून टाकण्यात येईल. वारकऱ्यास दिंडीमध्ये कोणतीही व्यसन करता येणार नाही असे आढळल्यास दिंडीतून बाहेर काढण्यात येईल असे यावेळी दिंडी आयोजकांनी सांगितले. या दिंडी सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी होण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर (माऊली) बारगळ, हभप गजानन महाराज बारगळ, हभप साहेबराव महाराज शेळके, हभप बाळकृष्ण महाराज लोंढे, माजी उपनगराध्यक्ष भागिनाथ मरकड यांनी केले आहे. भद्रा मारोती येथून गेल्या अनेक वर्षांपासून आषाढी एकादशी निमित्त पायी दिंडी सोहळा रवाना होत असतो.शिस्तबद्ध दिंडी म्हणून या दिंडीची ओळख आहे.

# विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केली पाणीपुरवठा योजनेची पाहणी




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज जायकवाडी धरणातील उद्धव विहीर (जॅकवेल) पासून ते नक्षत्रवाडी येथील जलशुदधीकरण केंद्र येथे सुरू असलेल्या कामाची पाहणी केली. छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजनेची सर्व तांत्रिक पूर्तता करून ती ऑक्टोबर अखेरीस कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे पाणीपुरवठा योजनेतील जॅकवेल, ॲप्रोच ब्रिज, फिल्टर प्लँट आदीसह सुरू असलेल्या कामाची पाहणी करून प्रत्येक कामाला काम पूर्ण करण्याबाबत विहित कालावधी निश्चित करण्यात आला आहे. विहित कालावधीत कामे पूर्ण करा,असे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज संबंधित यंत्रणेला दिले.

पाहणी दौऱ्यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता श्रीमती मनीषा पलांडे, नगरपालिका प्रशासन सह आयुक्त देविदास टेकाळे, मजीप्रचे कार्यकारी अभियंता किरण पाटील, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार श्री.देशमुख यांच्यासह सबंधित यंत्रणेचे प्रमुख उपस्थित होते. विभागीय आयुक्त श्री पापळकर म्हणाले, छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजनेची सर्व तांत्रिक पूर्तता करून ती ऑक्टोबर अखेरीस कार्यान्वित करण्यात येणार आहे. पाणीपुरवठ्यासाठी जॅकवेलचे काम वेळेत संपवून पाणी उपसा सुरू करणे, २६ एम एलडीचा टप्पा जूनअखेर पूर्ण करणे, यासह कंत्राटदारांनीही कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक यंत्रसामग्री आणि मनुष्यबळाचे नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कंत्राटदार कंपनी आणि महापालिकेच्या सबंधित यंत्रणेने आपसात समन्वय ठेवत विहित कालमर्यादेत काम पूर्ण होईल याकडे लक्ष द्यावे. म हापालिका व कंपनीतर्फे करण्यात येणारी उपाययोजना याबाबत त्यांनी माहिती घेतली.

विहित कालमर्यादेत काम पूर्ण करण्यासाठी मनुष्यबळ वाढविणे, २४ ठिकाणच्या जोडण्या पूर्ण करणे, ३० टाक्याचे बांधकाम आणि वितरण व्यवस्था जोडणीचे काम मागे पडले आहे ते काम कंत्राटदाराने पूर्ण करण्याबाबत विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी सूचना दिल्या.

जायकवाडी धरणक्षेत्रातील जॅकवेल, चितेगाव येथे सुरू असलेले मुख्य जलवाहिनीचे काम, फारोळा येथील २६ दशलक्ष प्रतिदिन क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र, नक्षत्रवाडी येथील ३९२ दशलक्ष प्रतिदिन क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र, नक्षत्रवाडी येथील मुख्य संतुलन जलकुंभ या सुरू असलेल्या कामाच्या ठिकाणी पाहणी करून अडचणीही जाणून घेतल्या. मा.उच्च न्यायालयात पाणी पुरवठा योजनेबाबत जनहित याचिका सुरू असून प्रशासनाकडून मा.उच्च न्यायालयाला वेळेवेळी पाणीपुरवठा योजनेबाबत आढावा दिला जातो. ११ जून रोजी याबाबतचा आढावा देण्यात आला. मुख्यमंत्री महोदय यांनीही मुंबई येथे नुकतीच पाणीपुरवठा योजनेबाबत आढावा बैठक घेतली असून या बैठकीत छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजनेची सर्व तांत्रिक पूर्तता करून ती ऑक्टोबर अखेरीस कार्यान्वित करा असे निर्देश देण्यात आले आहेत. यावेळी संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com.